# निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करते की, "Mudhol State in the 20th Century" हा प्रबंध माझे संशोधक मार्गदर्शक **डॉ. (सौ.) पी. ए. पाटील** यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वतः लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्. फिल्. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर केला आहे.

कोल्हापूर.
दिनांक : २८ - ६- १९९६

**सौ. मंजुश्री एस्. घोरपडे**
अभ्यासक

# प्र मा ण प त्र

सौ. मंजुश्री एस्. घोरपडे यांनी इतिहास विषयातील एम् फिल्. पदावीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. यांजकडे सादर करावयाचा "Mudhol State in the 20th Century" हा प्रबंध माझ्या मार्गदर्शखाली पूर्ण केला आहे. सौ. मंजुश्री एस्. घोरपडे यांनी लिहिलेला प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारीत आहे.

PAPatil

मार्गदर्शक

**डॉ. (सौ.) पी. ए. पाटील,**

इतिहास विभाग,

शिवाजी विद्यापीठ.

कोल्हापूर.

# प्रास्ताविक

''२० व्या शतकातील मुधोळ संस्थान इ. स. १९०१ ते १९४८ हा शोधप्रबंध मी. एम. फिल. (इतिहास) या पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर करीत आहे. हा विषय निवडण्याचे प्रमुख कारण म्हणजे मुधोळ संस्थानच्या ''इतिहासावर अनेकांनी लिखाण केले आहे. पण इ. स. १९०१ ते १९४८ या कालखंडातील मुधोळचे राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व संस्थान विलीणीकरण, यावर फारसे लिखाण झाले नाही. मुधोळ मधील २० व्या शतकातील घडामोडीचे आकलण होणे आवश्यक आहे. यासाठी मी हा विषय संशोधना साठी निवडला व त्यासाठी लागणारी साधन सामुग्री जमा केली.

एम. फिल. पदवीसाठीचा प्रबंध तयार करीत असताना, साधनांचा शोध घेत असताना व त्यांचा अभ्यास करीत असताना अनेक व्यक्ती आणि संस्था यांचे बहुमोल सहकार्य मला मिळाले. त्या सर्वांचा. येथे नामोल्लेख करणे अशक्य आहे. तथापि त्यातील काही व्यक्ती आणि संस्था यांचा उल्लेख करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

सर्वप्रथम मी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ सौ. पद्मजा पाटील, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आभार मानते. मला माझ्या अभ्यासात त्यांनी बहुमोल सहकार्य केले. अवघडात अवघड असणारी गोष्ट सोपी व सुटसुटीत करणे हे केवळ त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मला शक्य झाले. त्याचप्रमाणे या कामाच्या पुर्ततेसाठी माझ्या बाबतीत दाखविलेले प्रेम, आपुलकी आणि सहकार्य या सर्व गोष्टी मुळेच मला काम करणे शक्य झाले. त्यांची मी मन:पूर्वक ऋणी आहे.

तसेच या कामासाठी मला इतिहास विभाग प्रमुख डॉ. कांबळेसर, डॉ. कदमसर, डॉ. भोसलेसर, डॉ. खणेसर, डॉ. पाटील सर, डॉ. सौ. पारेकर यांचेही सहकार्य व मागदर्शन लाभले आहे. या सर्वांची मी आभारी आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी कापशी येथील श्री संत गाडगे महाविद्यालयाचे प्राचार्य दत्ता कांबळे सर यांनी मला जे मौलीक मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. याच महाविद्यालयातील माझे गुरु प्रा. इंगवले सर यांची ही मला माझ्या संशोधन कार्यास बहुमोल सहकार्य केले. माझे सहकारी प्रा. मगदूम सर, प्रा. दुधाळे सर, प्रा. राऊतसर, प्रा. रुपनवर सर, प्रा. पाटीलसर, प्रा. नरळे सर, प्रा. चव्हाण सर, ग्रंथपाल सौ. देशपांडे इत्यादींनी मला अभ्यास पूर्ण करण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक प्रोत्साहन दिले. त्या सर्वांची मी आभारी आहे.